७५३

वाचा :- १) या कार्यालयातील परिपत्रक क्र. एल आर २२७/ सी .आर.१९३०/भू-३/२०००, दिनांक २७/१०/२०००,

२) या कार्यालयातील आदेश क्र. एल आर २२७/ सी आर ३९२६/ भू-३/२००१, दिनांक ३०/१०/२००१

---

क्र. एल आर २२७/सी आर ३९२६/भू-३/२००१
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म.राज्य)यांचे कार्यालय
नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला
पुणे, दिनांक ७/१/२००२
- 7 JAN 2002

विषयः- सुधारित मोजणी फी दर

पुरवणी आदेश :

या कार्यालयाकडील दिनांक ३०/१०/२००१ च्या आदेशान्वये मोजणी फी चे सुधारित दर दिनांक १/११/२००१ पासून लागू करण्यात आलेले आहेत. परंतु त्यातील काही तरतुदी संदिग्ध असल्याचे निदर्शनास आल्याने प्रस्तुत पुरवणी आदेशाद्वारे त्यामध्ये अंशतः बदल करून पुढील प्रमाणे स्वयंस्पष्ट आदेश देण्यात येत आहेत.

१) जिरायत व बागायतीसाठी स्वतंत्र मोजणी फी चे दर आहेत. परंतु गाव नमुना नं.७/१२ वर, बागायत, मिश्र बागायत, तरी, वरकस, गवत, विहीर पड, वस्तीपड अशा प्रकारच्या नोंदी असतात. अश्या जमीनीचे मोजणीसाठी पुढील प्रमाणे मोजणी फी आकारावी.

5 FEB 2002

अ) ज्या जमीनीचे ७/१२ चे नोंदीमध्ये मिश्र बागायत अशी नोंद असेल त्या स.नं. / ग.नं./ हिस्सानंबर / प्लॉट नंबर मधील १ हेक्टर पर्यत किंवा १ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र बागायत असेल अश्या भागासाठी परिच्छेद २अ/१, ३अ/१,व ४अ/१ चे तरतुदी मधील बागायत दराने मोजणी फी आकारण्याची असून त्या पेक्षा जास्त बागायत क्षेत्र नमूद असल्यास पुढील १ हेक्टर किंवा त्याच्या भागास परिच्छेद २अ/२, ३अ/२ व ४अ/२ या दराने मोजणी फी आकारण्याची आहे. उर्वरित जिराईत क्षेत्रास परिच्छेद २अ/२, ३अ/२ व ४अ/२ च्या जिरायत दराने मोजणी फी आकारण्याची आहे.

ब) बागायत व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या जमीनीस जिरायत दराने मोजणी फी आकारण्याची आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय

२) आदेशातील परिच्छेद २,३ व ४ मध्ये साधी, तातडी व अतितातडी मोजणी फी च्या तपशिलामध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

२.१ परिच्छेद २,३,व ४ मधील अ-१ उप परिच्छेदामध्ये ''एका धारकाचे पहिले १ हेक्टर मर्यादेपर्यंत ''या ऐवजी ''एका किंवा समान धारकाचे पहिल्या एक सर्व्हेनंबर / गटनंबर / पोटहिस्सा नंबर / मंजूर रेखांकनामधील एका प्लॉटसाठी, १ हेक्टर क्षेत्राचे मर्यादेपर्यंत'' असे वाचावे.

२.२ परिच्छेद २,३ व ४ मधील अ-२ उप परिच्छेदामध्ये ''पुढील प्रत्येक हेक्टर क्षेत्र अथवा त्याच्या भागास ''ऐवजी '' त्याच मिळकतीमधील उर्वरित क्षेत्राच्या पुढील प्रत्येक हेक्टर क्षेत्रास अथवा त्याच्या भागास व त्याच एका किंवा समान धारकाच्या त्याच स.नं./ ग.नं. पैकी पुढील पोटहिस्सा नंबर / मंजूर रेखांकनातील प्लॉटसाठी १ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत अथवा त्याच्या भागास '' असे वाचावे.

२.३ परिच्छेद २,३, व ४ मधील ब-१ उप परिच्छेदामध्ये '' महानगर पालिका व नगर पालिका /परिषद क्षेत्रातील प्रत्येक मिळकतीस'' या ऐवजी ''नागरी कमाल जमीन धारणा कायदा'' ज्या महानगर पालिकेस लागु आहे. अश्या महानगर पालिकेच्या हद्दीमधील एका किंवा समान धारकाच्या प्रत्येक मिळकतीच्या १० आर किंवा १००० चौ.मि. क्षेत्रापर्यंत व अन्य महानगर पालिका व नगर परिषद /पालिका हद्दीमधील एका किंवा समान धारकाच्या प्रत्येक मिळकतीच्या २० आर किंवा २००० चौ.मि.क्षेत्रापर्यंत '' असे वाचावे.

२.४ परिच्छेद २,३ व ४ मधील ब-२ उप परिच्छेदामध्ये '' प्रत्येल लगत जादा मिळकतीस '' ऐवजी '' त्याच मिळकती मधील उर्वरित क्षेत्रासाठी नागरी कमाल जमीन धारणाा कायदा ज्या महानगर पालिकेस लागु आहे अश्या महानगर पालिका हद्दीमधील पुढील प्रत्येक १० आर किंवा १००० चौ.मि. क्षेत्राचे मर्यादेपर्यंत व अन्य महानगर पालिका, नगर परिषदा/ नगर पालिका हद्दीमधील २० आर किंवा २००० चौ.मि. क्षेत्राचे मर्यादेपर्यंत किंवा त्याच्या भागास आणि त्याच एका किंवा समान धारकांच्या लगत जादा मिळकतीस '' असे वाचावे.

३) <u>पोटहिस्सा मोजणी : मंजूर रेखांकन आराखड्यानुसार प्लॉटची मोजणी.</u>

दिनांक ३०/१०/२००१ चे आदेशामधील परिच्छेद ५ मधील सुचना मागे घेण्यात येत असून त्या ऐवजी खालीलप्रमाणे तपशिलवार आदेश देण्यात येत आहे.

९५५ – ११ – ८

३.१ " ज्या मिळकतीमध्ये भूमि अभिलेख विभागाकडून फाळणी अभिलेख तयार झालेले नाहीत. परंतु अधिकार अभिलेखामध्ये (७/१२) स्वतंत्र पाने उघडलेली आहेत. अश्या जमीनीची/ मिळकतीची मोजणी करण्यासाठी अर्जदार यांनी अर्जासोबत जोडलेल्या प्रत्येक अधिकार अभिलेखाची (७/१२) ही स्वतंत्र जमीन / मिळकत समजून वरील आदेशाप्रमाणे प्रत्येक हिंनं./ भूखंड क्रमांक यास जिरायत व बागायत दराप्रमाणे व महानगर पालिका / नगर पालिकेतील/ परिषदा हद्दीमध्ये वरील परिच्छेद २.१ व २.३ मधील तरतुदीत नमूद केल्याप्रमाणे मोजणी फी आकारण्याचे आहे. मात्र एकाच स.नं. / ग.नं./ हि.नं. मध्ये एकाच किंवा समान धारकाचे अनेक हिस्से किंवा भूखंड असतील त्याच्या प्रत्येक हिश्यास / भूखंडास वरील परिच्छेद २.२ व २.४ मध्ये नमूद केलेल्या तरतुदी प्रमाणे मोजणी फी आकारण्याची आहे.

३.२ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील का.क.८५ च्या तरतुदीप्रमाणे सक्षम प्राधिका-यांने नविन पोट विभागणी केली असेल किंवा का.क.८७ मधील तरतुदी प्रमाणे सर्वधारकाचे संमतीने पोट विभागणीसाठी अर्जदारांनी अर्ज केला असेल अश्या मिळकतीची मोजणी करण्यासाठी एका स.नं./ग.नं./हिस्सा नं./ न.भू.क्र. / भूखंड क्रमांकामधील एका पोट विभागास उपरोक्त परिच्छेद २.१ व २.३ मधील तरतुदीप्रमाणे व उर्वरीत प्रत्येक पोट विभागास उपरोक्त परिच्छेद २.२ व २.४ मधील तरतुदीप्रमाणे मोजणी फी आकारण्याची आहे.

३.३ **नगर भूमापन (गांवठाण)हद्दीतील पोटविभागणी:-** दिनांक ३०/१०/२००१ च्या आदेशातील परिच्छेद क्र.२, ३ व ४ मधील ब-३ व ब-४ परिच्छेदामधील तरतुदीनुसार त्या ग्रामिण भागातील गांवठाण मिळकतीचे पोट विभागणीसाठी मोजणी फी आकारण्याचे आहे.

४) दिनांक २७/१०/२००० चे परिपत्रकात कोर्टवाटप / कोर्ट कमिशन मोजणी प्रकरणात अतितातडीची मोजणी फी आकारावी अश्या सुचना देण्यात आलेल्या होत्या. अतितातडीची प्रकरणे, २ महात निकाली करणे आवश्यक आहे, परंतु कोर्टवाटप / कोर्ट कमिशन प्रकरणामध्ये विहीत मुदतीच्या नोटीसा (अनुक्रमे एक महिना / १४ दिवस) संबंधिताना रजिस्टर पोष्टाने नोटीसा पाठवून पोचपावती प्राप्त होणे आवश्यक असल्याने, नोटीसीचा कालावधी विचारात घेता सदर प्रकरणात निपटारा २ महात होत नाही, असा पुर्वानुभव असल्यामुळे सदर प्रकरणाचा निपटारा होण्यासाठी किमान ३ महाचा कालावधी आवश्यक आहे. म्हणून अतितातडी ऐवजी तातडीच्या दराने मोजणी फी स्विकारावी अशी दिनांक ३०/१०/२००१ चे आदेशात तरतुद केलेली असून ती तरतूद योग्य असल्याने, त्यानुसार तातडीच्या प्रकरणासाठी विहीत केलेली मोजणी फी आकारून ३ महात सदर प्रकरणाचा

अंतिम निपटारा करण्याचा आहे. दिनांक २७/१०/२००० चे परिपत्रक या दुरूस्ती आदेशाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

दिनांक ३०/१०/२००१ चे आदेशातील इतर तरतुदी / सुचना कायम आहेत.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ होण्याची आहे.

स्वाक्षरी/-
(डॉ.सुधीरकुमार गोयल)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य.